www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०८ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.०८ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

# ४ जूनला इंडिया आघाडीचा शेवट होईल-पंतप्रधान मोदी





**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्या नगर येथे रखरखत्या उन्हात दुपारी विराट सभा झाली, त्यावेळी जनतेची अलोट गर्दी उसळली होती, महिला, पुरूष, लहान थोर वृद्ध तरुण तरुणी सहभागी झाले होते, यावेळी उपस्थित जनसमुदायाला विश्व नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधले की...

चार जून २४ ला इंडिया आघाडीचा शेवट होईल.... त्यानंतर या आघाडीचे झेंडे उचलायलाही कोणी मिळणार नाही, अशी प्रखर टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली असून , काँग्रेसने गेले ५० वर्ष गरीबी हटवण्याचे खोटे आश्वासन दिले, असेही ते म्हणाले. अहिल्या नगरमधील महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना त्यांनी ही टीका केली.

श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांनी दिला त्या साईबाबांच्या चरणी नतमस्तक होतो. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनाही कोटी कोटी अभिवादन करतो. असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदनगर जिल्ह्यातील प्रचार सभेला मराठीतून सुरुवात केली. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील तसेच शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार सदाशिवराव लोखंडे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे नगरमध्ये आयोजन करण्यात आले होते, या वेळी ते बोलत होते.यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री भागवत कराड, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री दादा भुसे, माजी मंत्री मधुकर पिचड, जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिवाजी कर्डिले, आमदार संग्राम जगताप, आमदार अशुतोष काळे, आ. मोनिका राजळे, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, राष्ट्रवादीच्या अनुराधाताई नागवडे, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भानुदास बेरड, बाबुसाहेब टायरवाले, विक्रम पाचपुते यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेसची बी टीम ॲटिव्ह झाली असून सीमेच्या पलीकडून ट्विट केले जात असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. त्या बदल्यात काँग्रेसचे नेते पाकिस्तानला दहशतवादी हल्ल्यातून लीन चीट देण्याचे काम करत आहेत. मुंबईमध्ये झालेला २६/११ चा हल्ला पाकिस्तान ने केलेला हल्ला होता. आपल्या जवानांना दहशतवाद्यांनी शहीद केले होते. आपल्या निर्दोष नागरिकांची हत्या दहशतवाद्यांनी केली होती. हे सर्व जगाला माहिती आहे. न्यायालयाने देखील या विषयावर निर्णय दिला आहे. इतकच नाही तर पाकिस्तानने देखील दहशतवादी हल्ला झाल्याचे मान्य केले आहे. या दहशतवाद्यांचे फोन रेकॉर्ड उपलब्ध आहेत. असे असताना काँग्रेस पक्षाचे नेते आता दहशतवाद्यांना निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र जाहीर करत आहेत. २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्या संदर्भात काँग्रेसच्या नेत्यांचे वक्तव्य अतिशय धोकादायक असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. आता काँग्रेस पक्षातील नेते आतंकी कसाबची बाजू मांडत असल्याचे मोदी यांनी सांगित विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. मुंबई हल्ल्यातील सर्व निर्दोष नागरिकांचा अपमान आहे. हा मुंबई हल्ल्यात सर्व दहशतवाद्यांना मारणार्या सुरक्षा दलाचा हा अपमान आहे. शहीद तुकाराम वांजळे सारख्या सर्व शहिदांचा हा अपमान असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. काँग्रेस देशाला कोणत्या बाजूला घेऊन जात आहे? असा प्रश्न देखील नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केला. तुष्टीकरण करण्याच्या नादात काँग्रेस आपली पातळी खाली आणत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे. अशा काँग्रेसला महाराष्ट्रात एक देखील जागा मिळायला नको, असे देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.काँग्रेस आणि त्यांचे सहकारी खतरनाक खेळ खेळत असल्याचे मी अनेक दिवसापासून सांगत होतो. आता इंडिया आघाडीच्या एका मोठ्या नेत्याने या खतरनाक खेळावरुन पडदा काढला आहे. जो नेता आताच तुरुंगातून बाहेर आला आहे. तो नेता म्हणजे लालूप्रसाद यादव असून त्यांनी देशात इंडिया आघाडीचे सरकार आले मुस्लिमांना आरक्षण देणार असल्याचे जाहीर केले असल्याचे मोदींनी म्हटले आहे. इतकेच नाही तर ते मुस्लिमांना पूर्ण आरक्षण देणार असल्याचा दावा लालूप्रसाद यादव यांनी केला असल्याचे मोदी म्हणाले.वास्तविक देशात एससी, एनटी, ओबीसी या समाजाकडे पूर्ण आरक्षण आहे. त्यामुळे आता इंडिया आघाडी हे पूर्ण आरक्षण काढून मुसलमान समाजाला देणार असल्याचे सांगत आहे, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. या माध्यमातून केवळ स्वत:च्या मतदारांना खुश करण्याचे काम इंडिया आघाडी करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला. जे काम करण्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थांबवले होते तेच काम त्यांना करायचे असल्याचे मोदी यांनी म्हटले आहे. धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यास संविधानाने मनाई केली आहे. तरी देखील ते संविधान बदलायचे असल्यामुळेच अशा पद्धतीने आरक्षण देण्याची भाषा काँग्रेस करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे.निवडणुकीच्या पूर्वी जो भानुमतीचा कुणबा एकत्र आला होता. हा कुणबा ४ जून नंतर वाळूच्या किल्ल्याप्रमाणे संपणार असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. यावेळेस निवडणूक ही संतुष्टीकरण आणि तृष्टीकरण यांच्या दरम्यान होत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. एनडीए मेहनतीच्या माध्यमातून संतुष्टीकरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे इंडि आघाडीचे नेते तृष्टीकरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे.काँग्रेस पक्षाने जाहीर केलेला जाहीरनामा हा पूर्णपणे मुस्लिम लीगचा जाहीरनामा असल्याचा दावा पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. भारतीय जनता पक्ष आणि एनडीएतील घटक पक्षातील जाहीरनाम्यात कोणते मुद्दे देण्यात आले आहेत, विकास, गरीब कल्याण, राष्ट्रीय सुरक्षा, देशाचा स्वाभिमान, देशाचा सन्मान हे सर्व एनडीएच्या जाहीरनाम्यातील मुद्दे असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. यातील एकाही मुद्द्यावर काँग्रेस बोलत नसल्याचा आरोप नरेंद्र मोदी केला आहे.काँग्रेसने ५० वर्ष गरिबी हटवण्याचे खोटे आश्वासन दिले होते. गरिबांसोबत काँग्रेसने सर्वात मोठा विश्वासघात केला असल्याचा आरोप नरेंद्र मोदी यांनी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्याला विरोध केला होता. त्या जाती आधारीत आरक्षण देण्याची भाषा काँग्रेस करत असल्याचे नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, अहमदनगर जिल्ह्याचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर करण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. त्यांचे अहिल्यादेवी नगरकरांच्यावतीने अभिनंदन करतो. दरम्यान, कुकडी व साकळाई योजनेचे काम ात्काळ सुरु करण्याची मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. तसेच अहमदनगर जिल्ह्याचा पाणी प्रश्न सोडविण्याची मागणीही त्यांनी केली. तिसर्यांना पंतप्रधान मोदी यांना करण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील व सदाशिव लोखंडे यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी खा. सदाशिव लोखंडे, आमदार मोनिका राजळे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले यांची भाषणे झाली.

## वादळी वाऱ्याने अनेकांच्या घराचे छत उडाले;नागरिकांची मोठी नुकसान



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यात दि.(६) सोमवारी मोठ्या प्रमाणात वादळी वारा आला.वादळात अनेकांच्या घरावरील टीनाचे छत, गुरांचे गोठे उडाले घरांची मोठी पडझड झाली सर्व सामान्यांची नुकसान झालेली पाहायला मिळत आहे.वढोली - लिखितवाडा मार्गावर व गावात अनेक झाडे कोसळून पडले.अनेकांच्या घरावर

गोंडपिपरी येथील तलाठी कार्यालयावरील टिनाचे छत उडाले.जनावरांच्या चाऱ्याची नासधूस झाली.शेतकरी व नुकसानग्रस्त गावकरी यांनी तात्काळ नुकसानाची पंचनामे करून मदत करावी अशी मागणी केली.घटनेची माहिती मिळताच तहसीलदार शुभम बहाकर यांनी तलाठी सुरज राठोड यांना नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले.मंगळवारी दुपारी ३ वाजता तलाठी राठोड यांनी पडझडीचे पंचनामे करत शासनाकडे मदतीसाठी प्रस्ताव पाठवला आहे.

## ट्रकच्या धडकेत युवकाचा जागीच मृत्यू

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी येथील शिवाजी चौकात आष्टी मार्गे चंद्रपूर जाणाऱ्या ट्रकने पायदळ जाणाऱ्या युवकाला जबर धडक दिली.धडकेत युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटणा दि (६ ) सोमवारी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली.

माता वार्ड येथील बाबा गेडाम वय (४०) जेवण झाल्यानंतर शतपावली करण्यासाठी शिवाजी चौक परिसराकडे गेला.रात्री १० वाजता घरी परतताना आष्टी कडून चंद्रपूर जाणाऱ्या भरधाव ट्रक -झ २७ ढन १६६६ ने बाबाला जबर धडक दिली.धडकेत जागीच मृत्यू झाला.घरचा कमावता पुरुष असल्याने मृत्यूने काही वेळ तणावाची परस्थिती निर्माण झाली.ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांनी परस्थिती हाताळली. सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून मध्यस्थी करत बाबा गेडाम यांच्या कुटुंबीयांना २५ हजाराची मदत मिळवून देण्यात आली.त्याच्या पच्यात आई,पत्नी,दोन मुले असा आप्त परिवार आहे.

## मतदान करून सुप्रिया सुळे थेट अजितदादांच्या घरी:बारामती मध्ये मोठा राजकीय ट्विस्ट

**बारामती**–लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान आज होत असतानाच बारामतीमधून एक मोठी बातमी समोर आली आहे. शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे या थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीला पोहोचल्या आहेत. अजित पवार आणि त्यांच्या आई काटेवाडीत आहेत, त्यांच्या भेटीसाठी सुप्रिया सुळे एकट्याच गेल्या आहेत. काकी आशाताई यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी मी आले होते असे सुप्रिया सुळे यांनी म्हंटले आहे. मात्र या भेटीमुळे बारामतीच्या राजकारणात मोठा ट्विस्ट पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

भेटीनंतर सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, ''मी आशा काकी यांना नमस्कार करण्यासाठी आले होते. घरात फक्त मी आणि काकीच होते. मी फक्त काकींची भेट घेतली. तुम्ही अजित पवार यांच्या घरी अचानक आल्या? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांचा विचारला. त्यावेळी त्यांनी हे माझ्या काका, काकींचे घर आहे. माझ्या आयुष्यातील लहाणपण याच घरात राहत गेले आहे. मी या घरात दोन- दोन महिने राहिले आहे. त्यावेळी माझ्या आईशी बोलणे होत नव्हते. जेवढे माझ्या आईंनी माझे केले नाही, तेवढे माझ्या सर्व काकींनी माझ्यासाठी केले'' अशी भावना सुप्रिया सुळेंनी व्यक्त केली आहे.दरम्यान, आज बारामती लोकसभा मतदारसंघासाठी मतदान होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सहकुटुंब आणि खासदार सुप्रिया सुळे यांनीही शरद पवारांसह सकाळी मतदानाचा हक्क बजावला. यांनतर मतदान करताच सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांचे घर गाठल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

## खळबळजनक ;गोंडपिपरीतील दोन चिमुकले तलावात बुडाले

### पोहणे जीवावर बेतले;शोधमोहीम सुरु

**गोंडपिपरी । सूरज माडूरवार**

गोंडपिपरी येथील न्यायालयाच्या मागे तलावात मित्रांसोबत अंघोळीला गेलेल्या दोन चिमुकल्यांचा तलावात बुडाल्याची घटना दि(७) मंगळवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास घडली .सदर घटना ही रात्री आठ वाजता दरम्यान उघडकीस आली .माहिती मिळताच गावकरी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बुडालेल्या बालकांची शोधमोहीम हाती घेतली .मात्र वृत्त लिहेपर्यंत मृतकांचा शोध लागला नाही. गौरव विलास ठाकूर वय १४ वर्ष राहणार गोंडपिंपरी शिवाजी चौक,शौर्य भास्कर पिंपळशेंडे वय १५ वर्ष रा.गोंडपिंपरी शिवाजी चौक अशी तलावात बुडालेल्या मुलांची नावे आहेत उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या असल्याने व उन्हाचा पारा जास्त असल्याने मंगळवारी सकाळी बारा वाजता दरम्यान वार्डातीलच काही मुले फिरायसाठी गेल्यानंतर त्यांना तलावात पोहण्याचां मोह आवरला नाही.चिमुकले पोहण्यासाठी





तलावात गेले तेथील काही मुले घरी परतले तर दोघे बुडाले.मात्र भीतीपोटी ईतर चिमुकल्यांनी ही घटना घरच्यांना सांगितली नाही.बेपत्ता मुलांच्या घरच्यांनी शोधाशोध केली असता माहिती काढली असता पोहायला गेलेले समजले.कुटुंबीयांनी तलावाकडे रात्री ८ वाजता दरम्यान धाव घेतली.तलावाच्या बाहेर कपडे आढळले असून कपड्यांची ओडख पटली आहे.घटनेची माहिती मिळताच गोंडपिंपरी चे ठाणेदार रमेश हत्तीगोटे पोलीस ताफ्यासह घटनास्थळावर हजर झाले मृतदेह शोधण्यासाठी पथकाला प्राचारण करण्यात आले आहे.मात्र रात्र असल्याने अद्यापही पथक पोहोचले नाही.परंतु स्थानिक मासेमारांच्या सहकार्याने शोध मोहीम सुरू आहे. वृत्त लिहीपर्यंत त्या मुलांचा शोध लागला नाही या घटनेमुळे गोंडपिपरीत शोककडा पसरली आहे.

## पावसाळ्यातील संभाव्य संकटापूर्वी ना.मुनगंटीवार यांनी यंत्रणेला केले अलर्ट

### चंद्रपूर जिल्ह्याला पुराच्या धोक्यापासून सुरक्षित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांमध्ये चंद्रपूर जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये पुरामुळे मोठे नुकसान झाले. या पुरामुळे फटका बसलेल्या गावांना पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांतून तात्काळ मदतही मिळाली. पालकमंत्री यांनी दाखविलेले गांभीर्य आणि तत्परता कायमच चर्चेचा विषय राहिलेला आहे. आता निवडणुकीच्या धामधुमीतही ना. मुनगंटीवार आपली जबाबदारी पार पाडत असून त्यांनी पावसाळ्यातील संभाव्य संकटापूर्वीच यंत्रणेला अलर्ट केले आहे.

चंद्रपूरचे जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना पत्र लिहून यापूर्वीच्या पुरांचे संदर्भ देताना ना. सुधीर मुनगंटीवार यांनी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहे.चंद्रपूर जिल्ह्याच्या पालकत्वाची जाणीव ठेवत यंत्रणेला सज्ज राहण्याच्या सूचना केल्या आहेत. यापूर्वी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आलेला पूर कोणीही विसरेलेले नाहीत. या पुरामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा फटका सहन



करावा लागला होता. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. ना. मुनगंटीवार यांनी पालकमंत्री म्हणून युद्ध पातळीवर काम करण्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या होत्या. त्यांनी स्वतः पूर्णवेळ लक्ष देऊन नुकसान भरपाईसाठी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. परंतु, पुन्हा एकदा अशापद्धतीचा धोका उद्भवणार नाही, यासाठी यंत्रणेने सर्व उपाययोजना आधीच करण्याची गरज असल्याचे ना. श्री. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. 'चंद्रपूर शहरालगतच्या इरई व झरपट या नद्या वर्धा नदीस मिळतात. पूर्व विदर्भात पावसाचे प्रमाण जास्त असून या नद्यांना पूर येऊन चंद्रपूर शहरात पाणी शिरल्याच्या घटना घडलेल्या आहेत. ईरई व झरपट या दोन्ही नद्यांमध्ये गाळ व झुडपे मोठ्या प्रमाणात आहेत. अशाने पात्राची खोली कमी होऊन पुराचा धोका वाढू शकतो,' असे ना.सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे.शहरालगतच्या नद्यांचे खोलीकरण करणे तसेच शहरालगतच्या नद्यांवर सुरक्षा भिंत उभी करणे ही कामे होणे अत्यंत आवश्यक आहेत. यासंदर्भातील प्रस्ताव अनुभवी सल्लागार संस्थांमार्फत करून राज्य शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत केंद्र सरकारकडे सादर करावा, अशा सूचना ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे केल्या आहेत.

सह्याद्रीचा राखणदार




# मानवतेला समर्पित निःस्वार्थ सेवाभाव!

**रेडक्रॉस ही एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था गरजूंना आपातकाळी सेवा देते. ही संस्था रुग्ण, युद्धात घायाळ, नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकले असलेल्या लोकांना जीवनदान देण्याचे तसेच घायाळांवर वैद्यकीय उपचार करून त्यांना मदत करण्याचे कार्य करते. रेडक्रॉस मोहिमेचे जन्मदाते जीन हेन्री ड्युनेन्ट यांचा जन्म दि.८ मे १८२८ रोजी झाला. त्यांच्या जन्मदिन संपूर्ण विश्वात रेडक्रॉस दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक रेडक्रॉस दिनाला आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन म्हणून देखील साजरा केला जातो. ही संस्था तब्बल दीडशे वर्षांपासून काम करीत आहे. ही संस्था नैसर्गिक आणीबाणी प्रसंगी अडकलेल्या गरजूंना आपली नि:स्वार्थ सेवा देत असते. सदर ज्ञानवर्धक लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दांत अवश्य वाचा... संपादक.**

भारतात इ.स.१९२०मध्ये पार्लियामेंट्री एक्टच्या अंतर्गत भारतीय रेडक्रॉस समितीचे गठन केले गेले. तेव्हापासून रेडक्रॉसचे स्वयंसेवक आपली निःस्वार्थ सेवा देत आहेत. विश्वाचे तब्बल दोनशे देश एकाच विचारांवर ठाम आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संस्था नैसर्गिक आपदांमध्ये अडकलेल्या लोकांना तसेच युद्धामध्ये घायाळ झालेल्या वीरांना मदतीचा हात देऊन त्यांना यथोचित साहाय्य करतात. रेडक्रॉस ही एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था गरजूंना आपातकाळी सेवा देते. ही संस्था रुग्ण, युद्धात घायाळ, नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकले असलेल्या लोकांना जीवनदान देण्याचे तसेच घायाळांवर वैद्यकीय उपचार करून त्यांना मदत करण्याचे कार्य करते. रेडक्रॉस मोहिमेचे जन्मदाते जीन हेन्री ड्यूनेन्ट यांचा जन्म दि.८ मे १८२८ रोजी झाला. त्यांच्या जन्मदिन संपूर्ण विश्वात रेडक्रॉस दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक रेडक्रॉस दिनाला आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन म्हणून देखील साजरा केला जातो. ही संस्था तब्बल दीडशे वर्षांपासून काम करीत आहे. ही संस्था नैसर्गिक आणीबाणी प्रसंगी अडकलेल्या गरजूंना आपली निःस्वार्थ सेवा देत असते.

रेडक्रॉसचा मुख्य उद्देश्य रुग्णाची, युद्धामध्ये घायाळ झालेल्या लोकांची सेवा करणे आहे. सन १९१९पासून रेडक्रॉस मानवाचा त्रास कमी करण्याकडे विशेष लक्ष देत आहे. हेन्रीने सेवाकार्यात वाहिलेल्या या समितीला रेडक्रॉस नाव दिले. या समितीची ओळख पटण्यासाठी एका पांढऱ्या पट्टीवर लाल रंगाच्या क्रॉस चिन्हाला मान्य करण्यात आले. आता हे चिन्ह संपूर्ण विश्वात मानवास समर्पित निःस्वार्थ सेवाभाव म्हणून ओळखले जाते. पांढऱ्या शुभ्र पार्श्वभूमीवर अधिक चिन्हासारखी तांबडी फुली हे या संघटनेचे बोधचिन्ह असून त्यावरूनच संघटनेचे 'रेडक्रॉस' हे नाव पडले आहे. ड्यूनां हे स्वत्झर्लंडचे नागरिक असल्याने त्या देशाच्या सन्मानार्थ त्याच्या तांबड्या पार्श्वभूमीवरील पांढरी फुली असलेल्या राष्ट्रध्वजावरच्या रंगांची अदलाबदल करून हे चिन्ह तयार करण्यात आलेले आहे. इस्लामी राष्ट्रांत तांबड्या फुलीऐवजी पांढऱ्या पार्श्वभूमीवर चंद्रकोर- रेडक्रेसेंट तर इराणमध्ये उगवता तांबडा सूर्य व सिंह- रेड लायन अँड सन तर इज्राईलमध्ये तांबडा डेव्हिडचा तारा असा या बोधचिन्हात बदल केलेला आहे. हे बोधचिन्ह असलेली वाहने, इमारती तसेच ते धारण करणाऱ्या व्यक्ती यांच्यावर गोळीबार, बाँबफेक अथवा हल्ला करू नये, असेही ठरविण्यात आलेले आहे. अर्थात अशा वाहनांत वा इमारतींत युद्धसाहित्य अथवा सैनिक असता कामा नये. अशा प्रकारे संरक्षण योग्य ठिकाणे व व्यक्ती ओळखू येण्यासाठी हे चिन्ह वापरतात. आता तर हे चिन्ह वैद्यकीय व्यवसायाचेही निदर्शक झाले आहे.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

सध्याच्या काळात १८६ देशांमध्ये रेडक्रॉस समिती कार्य करीत आहे. सन १९०१ साली हेन्री ड्यूनेन्ट यांना त्यांच्या सेवाभावास पहिले नोबल शांती पारितोषिक देण्यात आले. विश्वाची पहिली ब्लड बँक- रक्त पेढी अमेरिकेमध्ये सन १९३७ साली उघडली गेली. आजच्या काळात जगातील जास्तीत जास्त ब्लड बँका रेडक्रॉस आणि त्यांच्या सहयोगी संस्था राबवत आहेत. रेडक्रॉस संस्थेने राबवलेल्या जनजागृती मोहिमेमुळे हजारो लोक थॅलेसेमिया, कर्करोग, रक्ताल्पता- एनिमिया यासारख्या आजारांपासून वाचत आहेत. रेडक्रॉस संघाच्या रूग्णसेवा कार्यालयात सन १९५१ साली समाजसेवा विभाग समाविष्ट करण्यात आला. हा विभाग माहिती विषयक सेवा पुरवितो. रेडक्रॉसच्या शिष्यवृत्तीसाठी उमेदवार निवडतो व सल्ला देतो. तसेच रेडक्रॉस रूग्णसेवा शाळा, रूग्णपरिचारिकांचे मदतनीस व गृहरूग्णसेवा शिक्षक यांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन करतो. संघाच्या प्रादेशिक परिषदांमुळे राष्ट्रीय संस्थांना विविध देशांसमोर येणाऱ्या सामाईक अडीअडचणींच्या माहितीची देवाणघेवाण करता येते. जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय निर्वासित संघटना, अन्न व कृषि संघटना, युनेस्को इत्यादींची उद्दिष्टे व रेडक्रॉसची उद्दीष्टे यांत बऱ्याच बाबतींत सारखेपणा असल्याने संघ त्यांच्याशी संपर्क ठेवून असतो व त्यांच्याशी सहकार्यही करतो. संघाचे वेगळे कनिष्ठ रेडक्रॉस कार्यालय असून त्याच्यातर्फे कनिष्ठ विभागांना साहाय्य देण्यात येते. राष्ट्रीय रेडक्रॉस संस्थांमार्फत ७५ पेक्षा अधिक देशांमध्ये मुख्यत्वे प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे कनिष्ठ विभाग संघटित करण्यात आलेले आहेत. विविध वंशांच्या भिन्न संस्कृतींत वाढणाऱ्या मुलांमधील मैत्री व परस्परांविषयीची जाणीव वाढविणे, हेच या विभागांचे मुख्य उद्दिष्ट आहे. !! विश्व रेडक्रॉस दिनाच्या सर्वांना प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा !!

# मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदार संघात २७ उमेदवार रिंगणात

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उत्तर मध्य मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी २७ उमेदवार रिंगणात आहेत. या मतदारसंघात २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सोनाली मुळे यांनी दिली आहे.

आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे अशी (अनुक्रमे नाव, पक्ष आणि चिन्ह या क्रमाने) : अयुब अमीन हुनगुंद (बहुजन समाज पार्टी, हत्ती), ड. उज्वल निकम (भारतीय जनता पार्टी, कमळ), गायकवाड वर्षा एकनाथ (इंडियन नॅशनल काँग्रेस, हात), न्सन थॉमस (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया सेक्युलर, द्राक्षे), कुर्बान शहादत हुसेन (राष्ट्रीय ओलमा कौन्सिल, बॅट), खान अब्बास अहमद (बहुजन महा पार्टी, शिट्टी), डॉ. (ड.) यशवंत रामभाऊ कसबे (भारतीय जनविकास आघाडी, कोट), रमजान अली चौधरी (ऑल इंडिया मजलिस- ए- इत्तेहादुल मुस्लिमीन, पंतग), शौकत अब्दुल रफीक खान (इन्सानियत पार्टी, ऑटो रिक्षा), संतोष गणपत अंबुलगे (वंचित बहुजन आघाडी, गॅस सिलेंडर), हयात्तुल्लाह अब्दुल्लाह शेख (अखिल भारतीय मुस्लिम लीग सेक्युलर, बॅटरी टॉर्च), हर्षदा बाबूराव जाधव (महाराष्ट्र विकास आघाडी, रोड रोलर), अब्दुल ताहीर डव्होकेट (बबलू रजनीकांत, अपक्ष, काडेपेटी), ड. असिफ अली सिद्दीकी (अपक्ष, जहाज), ड. उत्तमकुमार नकुल सजनी साहू (अपक्ष, बासरी), इजाज मोहम्मद सफी खान (अपक्ष, डंबेल्स), डॉ. गफ्फार इब्राहिम सय्यद (अपक्ष, स्टेथोस्कोप), नजमाखतून मोहम्मद जफर खान (अपक्ष, कॅमेरा), नरेंद्र मिश्रा (अपक्ष, सफरचंद), ड. फिरोज शेख (अपक्ष, स्पॅनर), मुझाफर अली शेख (अपक्ष, चालण्याची काठी), मुश्ताक हैदर शेख (अपक्ष, हिरा), युनूसअली रशीद मुल्ला (अपक्ष, दूरध्वनी), रमा अरुण साबळे (अपक्ष, नागरिक), राजेश मोहन लोखंडे (अपक्ष, खाट), शांताराम स. दिघे (अपक्ष, प्रेशर कुकर), संदीप (भाऊ) रामचंद्र जाधव (अपक्ष, पेनाची निब, सात किरणांसह).



# सिनेस्टाईल पाठलाग करत उधळला डाव, गाडीतील वस्तू पाहून थक्क, तब्बल २कोटिचे

**बीड । प्रतिनिधी**

भारताचे 'लाल सोनं' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चंदनाची खुलेआम तस्करी होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. बीडमध्ये पोलिसांनी तब्बल दोन कोटी चंदनाचा साठा जप्त केला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात चंदनाचा साठा जप्त करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. बीड तालुक्यातील बीडच्या
केज पोलीस ठाणे अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. चंदन तस्करावरुन अनेक प्रकरणे या पूर्वीही उघडकीस आली आहे. भारतातील तेलंगणा, कर्नाटका या राज्यात मोठ्या प्रमाणात चंदन तस्करीचे रॅकेट चालवले जाते. या
विषयावर पुष्पा हा सिनेमाही आला आहे. पुष्पा सिनेमानंतर पुन्हा एकदा चंदन तस्करीचे प्रकरणे समोर आले आहेत. भारताबाहेरी चंदनाला मोठी मागणी आहे. त्यामुळं अधिक किमतीने चंदनाची भारताबाहेरही तस्करी होत असते. महाराष्ट्रातही गेल्या काही दिवसांत चंदनाची होणारी तस्करीचे प्रकरण वाढले आहेत.

बीडच्या केज पोलिसांना गुप्त माहिती मिळताच त्यांनी सिनेस्टाइल सापळा रचून ही कारवाई केली आहे. पोलिसांनी तब्बल १२५० किलो चंदन जप्त केले आहे. या चंदनाची बाजारात किंमत दोन कोटी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोन चंदन तस्करांना अटक करण्यात आलं आहे. तर, यातील मास्टरमाइंडचा शोध पोलिसांकडून अद्याप सुरू आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत. चंदनाची मागणी इतकी का ? चंदनाचे प्रामुख्याने भारतात दोन प्रकार आढळतात. एक रक्तचंदन व एक पांढरं चंदन. लाल चंदनाचे झाड हिंदू धर्मात सर्वात पवित्र मानले जाते. पुजा-अर्चा करण्यासाठीही चंदनाचे खोड वापरले जाते. चंदनाच्या खोडात औषधी गुणधर्माबरोबरच नैसर्गिक
सुंगध असतो त्यामुळं त्याची किंमत जास्त आहे. सौंदर्य वाढवण्यासाठीही चंदनाचा वापर केला जातो. सौंदर्य प्रसाधनांमध्येही चंदनाचा वापर केला जातो. त्यामुळं रक्तचंदनाची मागणी खूप जास्त आहे. आंतरराष्ट्रीय बाज- रातही चंदनाची मागणी जास्त आहे.महाराष्ट्रात चंदनाची लागवड खूप कमी प्रमाणात केली जाते. आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यात मोठ्या प्रमाणात चंदनाची झाडे आढळतात. रक्तचंदनाची झाडे आंध्र प्रदेश राज्यातील शेषाचलम जंगलात जास्तप्रमाणात आढळतात. तर, महाराष्ट्रात दुष्काळी भागात चंदनाची थोडी फार झाडं आढळतात. कारण चंदनाच्या झाडाला पाण्याचे प्रमाण कमी लागते. विदर्भ, मराठवाड्यात आता चंदनाची शेतीही केली जाते. मात्र, महाराष्ट्रात पांढऱ्या चंदनाची झाडे आढळतात. कारण इथली जमिन लाल चंदनासाठी अनुकुल नाहीये.

# चारा दरात वाढ जनावरांना बाजाराची वाट पाण्याचीही टंचाई कडब्याचा दर तीन हजारांवर


**अहमदनगर । प्रतिनिधी**

सध्या उन्हाबरोबर वाढत्या महागाईच्या झळा शेतकऱ्यांना बसत आहेत जनावरांना लागणारा हिरवा चारा महाग झाला आहे कडब्याचा दर तीन हजारांपुढे गेल्याने शेतकऱ्यांकडून जनावरांना बाजाराची वाट दाखवली आहे

जनावरांना पोषक चारा म्हणून कडब्याला मागणी असते ज्यांच्याकडे बैल गायी म्हशी आहेत असे शेतकरी ज्वारीचा पेरा करतात अनेक शेतकरी खुरपणी काढणी कडबा बांधणी या भानगडीत न पडता हरभरा सोयाबीनची पेरणी करतात ज्वारीचा पेरा कमी क्षेत्रात असल्याने यदा कडबा भाव खात आहे दुभत्या जनावरांसाठी कडबा आवश्यक असल्याने त्याच्या मागणीत वाढ झाली आहे शेवगाव तालुक्यातील बोधेगाव आणि परिसरातील साठवण तलाव हे लघु आणि मध्यम स्वरुपाचे आहेत त्या सर्व तलावांनी तळ गाठला आहे त्यामुळे या साठवण तलावांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना चारा पिकांची लागवड शक्य झाली नाही बाजारात पुरवठ्यापेक्षाही मागणी अधिक झाल्याने भाववाढ होत आहे बाजारात कडब्याला मागणी अधिक असते साधारण मार्च ते जूनपर्यंत कडब्याची खरेदी विक्री होते जनावरांसाठी वाळलेला सकस आहार म्हणून कडब्याकडे पहिले जात असल्याने दूध व्यवसाय करणारा शेतकरी कडब्याला प्राधान्य देत आहे सध्या

जनावरांचा बाजार तेजीत असून आजारी जनावरांना सांभाळणे पशुपालकासाठी अत्यंत कठीण होत असल्याचे चित्र सध्या बोधेगाव परिसरात दिसत आहे त्यावर होणाऱ्या खर्चाचा विचार करता ही जनावरे बाजारात नेऊन विकलेली बरी असा विचार आता पशुपालक करीत आहेत हिरवा चारा आजारी जनावरांसाठी उपयुक्त असतो पाणी नसल्यामुळे चारा पिकांची लागवड झाली नाही त्यामुळे चाऱ्याचा तुटवडा जाणवत आहे कडबा आणि

चाऱ्याची टंचाई शेतकऱ्यांसाठी अडचणीची ठरली आहे खरीप हंगामातील मका बाजरी या पिकांचा चारा शेतकऱ्यांनी साठवला आहे तूर गव्हाचे भूस पशुखाद्य म्हणून वापरले जात आहे पौष्टिक खाद्य म्हणून कडब्याला पसंती असते पण दर वाढल्याने खरेदीवर परिणाम पहायला मिळत आहे. सध्या चारा आणि कडबा महागला असून हिरव्या चाऱ्यानेही महागाईचा उच्चांक केला आहे हिरवा चारा तुलनेने कमी आहे तर उन्हाळी चारा पिके घेण्यासाठी पाणी उपलब्ध नसल्यामुळे कडब्याचे दर वाढत आहेत यावर्षी चारा पिकांच्या लागवड क्षेत्रात कमालीची घट झाली आहे बाजारातील कडबा आणि हिरव्या चाऱ्याचे दर वाढल्याने पशुधन सांभाळणे अवघड बनले आहे प्रकाश काळे शेतकरी बोधेगाव



# महायुतीचे उमेदवार पियुष गोयल यांच्या प्रचार रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**मुंबई । प्रतिनिधी**

येत्या २० मे रोजी लोकसभेच्या निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी मुंबईत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर आज उत्तर मुंबईचे भाजपा महायुतीचे लोकप्रिय उमेदवार पियुष गोयल यांची प्रचार रॅली काढण्यात आली. या प्रचार रॅलीला नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नागरिकांनी पियुष गोयल यांच्या समर्थनार्थ 'जय श्रीराम'चा जयघोषही केला. आज सकाळी एस. एन. दुबे रोड जवळील हनुमान मंदिरात बजरंगबलीचे दर्शन घेऊन पियुष गोयल यांनी प्रचार रॅलीला सुरुवात केली. ठिकठिकाणी प्रचार रॅलीच्या निमित्ताने पियुष गोयल यांचे फटाक्यांची आतिषबाजी करत, फुलांची उधळण, पुष्पहार घालून नागरिकांकडून जंगी स्वागत करण्यात आले. पियुष गोयल यांनीही हात उंचावून अभिवादन करत ज्येष्ठासह नागरिकांचे आशीर्वाद स्वीकारले. ज्ञानेश्वर नगर, कोंकणीपाडा, सूर्योदय सोसायटी, कामत हॉटेल, विद्याभूषण शाळा, मारुती मंदिर, श्रीनाथ नगर, वीरसावरकर नगर, महिंद्रा नेन्सी कॉटेज, या ठिकाणाहून ढोल ताशाच्या गजरात निघालेल्या या प्रचार रॅलीची शांतीवन बोरिवली (पूर्व) येथे सांगता झाली. याप्रसंगी भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर, खासदार गोपाळ शेट्टी, शिवसेना आमदार प्रकाश सुर्वे, मुंबई भाजपा उपाध्यक्ष प्रकाश दरेकर यांसह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# तीन मुलांचे बोगस लग्न लावून आर्थिक फसवणूक : नकली तिघा वधूंसह पाच महिला गजाआडकासोदा पोलीस स्टेशनची दमदार कामगिरी ; संशयित आरोपी ह्या परराज्यातील टोळी

**एरंडोल । प्रतिनिधी**

कासोदा पोलीस स्टेशन परिसरातील तीन तरुणांना लग्नाचे आमिष दाखवून त्यांची लग्न लावून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तीन वधूंसह २ एजंट महिला यांना कासोदा पोलीस स्टेशनने कसून तपास करीत ताब्यात घेऊन अटक केली आहे. यामुळे कासोदा पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

लग्नाळू व्यक्तींना हेरुन त्यांच्याशी मध्यस्तांमार्फत संपर्क करुन लग्नासाठी मुली दाखविले जातात. नंतर २ ते ५ लाख रुपयेपर्यंत पैसे घेऊन त्यांच्याशी लग्न झालेल्या व त्यांना मुले असलेल्या मुलींशी लग्न लावुन दिले जाते. सदर मुली लग्नानंतर काही दिवस चांगला संसार करतात व विश्वास संपादन करुन घरातुन पैसे, सोने चोरुनं पळून जातात. अशी टोळी जिल्ह्यात सक्रीय असल्याची माहिती मिळाल्याने गुप्त बातमीदारांमार्फत माहीती प्राप्त करून सदर प्रकार उघडकीस आणुन कासोदा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील फिर्यादी यांने दिलेल्या फिर्यादीनसार यातील संशयित महिला आरोपीमोना दादाराव शेंडे (वय-२५ वर्षे), सरस्वती सोनु मगराज (वय-२८, दोन्ही रा. रायपुर, छत्तीसगड), अश्वीनी अरुण थोरात (वय-२६, रा. पांढुरना, मध्यप्रदेश) अशा तिघींचे कासोदा गावांतील ३ तरूणांसोबत संशयित सरलाबाई अनिल पाटील (वय-६० वर्षे), उषाबाई गोपाल विसपुते (वय-५०, दोन्ही नादेड ता. धरणगाव) यांनी दि. १६ एप्रिल रोजी लग्न लावुन दिलेले होते. यातील एका संशयित आरोपी हीने कबुल केले की, आम्हीं तिचे या पुर्वी लग्न झालेले असुन आम्हांला मुले आहेत व आम्ही तिघी फसवणुकीचा प्रकार करणेसाठी घरुन महाराष्ट्रात आलेलो आहोत.फिर्यादी व त्यांचे दोन साथीदार अशांना एजंट महिला संशयित आरोपी सरलाबाई अनिल पाटील, उषाबाई गोपाल विसपुते यांनी उपवर तिन्ही मुलांच्या घरच्यांना विश्वासात घेऊन व त्यांच्याशी लग्न लावून देण्याचे आमिष दाखवुन वेळोवेळी संपर्क करून, खोटे सांगितले. लग्नासाठी उपवर तिन्ही मुलांच्या घरच्याकडुन एकत्रीत ४ लाख १३ हजार रुपये उकळले. संशयित तिन्ही वधू मोना शेंडे, अश्विनी थोरात, सरस्वती मगराज यांचे यापुर्वी लग्न झालेले असुनसुध्दा त्यांनी ती माहिती लपवुनलग्न झालल असुनसुध्दा त्याना ती माहिती लपवुन फिर्यादीची व त्यांच्या दोन साथीदारांची आर्थिक फसवणुक केली.सदर आंतरराज्य टोळी जेरबंद करण्यासाठी पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक कविता नेरकर-पवार, सहा. पोलीस अधिक्षक अभयसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक निलेश दिवानसिंह राजपुत, सफौ रविंद्र पाटील, पोहेकॉ राकेश खोंडे, पोना किरण गाडीलोहार, पोकों/ इम्रान पठाण, पोकॉ नितिन पाटील, मपोकॉ/ सविता पाटील अशा पथकाने कारवाई केली.

# योग नृत्य परीवाराचे वतीने खाना खजाना आनंद मेळावा संपन्न

**मूल । प्रतिनिधी**

पाक कले मध्यें महिलांना वाव मिळावा आणि नागरीकांना विविध खादय पदार्थ एकाच ठिकाणी आस्वाद घेता यावा, या उद्देशाने योग नृत्य परीवार मूलच्या वतीने आयोजीत खाना खजाना आनंद मेळावा स्थानिक श्री मॉ दुर्गा मंदिराचे प्रांगणात नुकताच संपन्न झाला. मेळाव्यात साई श्रध्दा ग्रृपने प्रथम तर श्री साई ग्रृपने व्दितीय आणि साठवणे ग्रृपने तिसरा क्रमांक प्राप्त केला.

मेळाव्याचे उदघाटन योग नृत्य परिवार चंद्रपूरच्या संस्थापक सदस्या किशोरी हिरूळकर यांचे हस्ते फित आणि दिप प्रज्वलन करून झाले. यावेळी मेळाव्याचे प्रायोजक महालक्ष्मी ट्रेडींग कंपनीचे संचालक दिपक उर्फ डिंपी गोयल, व्हेरायटी हार्डवेअरचे संचालक प्रविण उधवाणी, योग इंटरप्राईजेसचे संचालक योग गोगरी यांचेसह योग नृत्य परिवार चंद्रपूरचे सदस्य सुरेश घोडके, रंजना मोडक, सरिता दुर्गे, आकाश घोडमारे, जितेंद्र इजगीरवार, अशोक पडगीलवार, संतोष पिंपळकर, चंदा घोडमारे आणि कांचन घोडमारे आदि उपस्थित होते. आयोजीत मेळाव्यात शहरातील वीस हौसी भगिनी आणि बंधुनी विविध पदार्थाचे स्टॉल लावले होते.

शहरातील साडे तीन हजाराचे वर बंधु भगिनींनी २५ रूपये प्रमाणे कुपन खरेदी करून मेळाव्यातील विविध खादय पदार्थाचा आस्वाद घेतला. स्पर्धेत साई श्रध्दा ग्रृपने प्रथम क्रमांकाचे ११ हजार रूपयाचे रोख बक्षीस प्राप्त केले तर श्री साई ग्रृपने ७ हजार रूपयाचा दुसरा क्रमांक पटकाविला. साठवणे ग्रृपने ५ हजार रूपयाचा तृतिय क्रमांक प्राप्त केला. विजेत्या सर्व स्पर्धकांना महालक्ष्मी ट्रेंडींग कंपनीचे संचालक दिपक उर्फ डिंपी गोयल आणि व्हेरायटीचे संचालक प्रविण उधवाणी यांचे हस्ते बक्षीस देण्यांत आले. विजेत्या तीन स्पर्धकांना स्व.हिना गोगरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ हिरेन गोगरी यांचे वतीने आणि स्व. दर्शना उधवाणी यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रविण उधवाणी यांचे कडून भेट वस्तु देण्यांत आली. तसेच विजेत्या तीन स्पर्धकांशिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या सारा ग्रृप, एमएच-३४ ग्रृप, थ्री स्टार ग्रृप, गणेश मल्हार ग्रृप, परीऋतु ग्रृप, संदीप बोरकुटे, जय माता दी ग्रृप, भावना मारकवार, फुडी स्टॉल, वैभव लक्ष्मी ग्रृप, नंणद भावजय ग्रृप, शारदा ग्रृप, महाकाली ग्रृप, शामला ग्रृपने आणि दुर्गेश्वरी ग्रृप या स्पर्धकांना महालक्ष्मी ट्रेडिंग कंपनीचे संचालक डिंपी गोयल यांचे वतीने भेट वस्तु देण्यांत आली यावेळी क्रांतीज्योती नागरी सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष गुरू गुरनूले उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन संयोजीका शामला बेलसरे यांनी केले, संयोजीका लिना जंबुलवार यांनी प्रास्ताविक तर संयोजीका आरती चेपुरवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी वैशाली बोकारे, वैशाली काळे, उमा महावादिवार, वैशाली घुगरे, सुनिता नेरल, सविता मारटकर, संगीता पाटील, समता बन्सोड, विद्या नागोसे, मोनीका कवाडकर, दिपाली मोहुर्ले, मिनाक्षी छोनकर, कल्पना मस्के, वर्षा पडोळे, राधीका बुक्कावार आदिंनी परिश्रम घेतले.



# आतंकवाद्याच समर्थन करणाऱ्या विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांच्या पुतळ्याला जाळून केला निषेध

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

देशाचे कर्तव्य बजावणारे पोलीस दलातील उच्च अधिकारी शहीद स्वर्गवासी हेमंतजी करकरे हे मुंबई येथील २६/११ ला पाकिस्तानी आतंकवाद्या सोबत लढताना पाकिस्तानी आतंकवादी अजमल कसाब यांची गोळी लागुन त्यांना वीर मरण आले होते. या घटनेमुळे संपूर्ण देशात शोककळा पसरून संपूर्ण भारतवासी लोकांच्या भावना दुखावल्या होत्या.पाकिस्तानी आतंकवादी अजमल कसाब व त्यांच्या साथीदारांचा भारत देश वासियांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला होता. या हल्ल्यातील आतंकवाद्याचा मुखिया अजमल कसाब यांना काही दिवसांनी कोर्टाने फाशी सुनावून त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली.विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार हे लोकांना संबोधित करताना देशात लोकसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून जातीधर्माचं गलिच्छ राजकारण करत पाकिस्तानी आतंकवादी अजमल कसाब सारख्या आतंकवाद्याला समर्थन करीत फिरत आहे. संपूर्ण देशातील लोकांच्या भावना दुखावत कोर्टाचा,पोलीस प्रशासनाचा अपमान करत शहीद हेमंत करकरे हे पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बंदुकीतील गोळीतून मारण्यात आले अशाप्रकारे त्यांच्या मुखातून व्यक्तव्य करत देशातील लोकांना संबोधित करत आहे.या व्यक्तव्या वरून विजय वडेट्टीवार यांचा संपूर्ण देशात तीव्र शब्दात निषेध करण्यात येत आहे. भारतीय जनता पार्टी तालुका गोंडपीपरी च्या वतीने शहरातील जुन्या बसस्थानकाजवळ आंदोलन करीत विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात तीव्र शब्दात घोषणाबाजी करून त्यांच्या पुतळ्याला जाळून विजय वडेट्टीवार यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.



यावेळी भाजपाचे जिल्हा सचिव बबन निकोडे, शहराध्यक्ष चेतन गौर, युवा नेता राकेश पुन,भाजपा युवा मोर्चा जिल्हा कार्यकारणी सदस्य पंकज चिलनकर,स्वप्नील बोनगीरवार, रमेश दिनगलवार, पंकज चिलनकर,संजय झाडे,गणपती चौधरी, गणेश मेरुगवार, अण्णा उलेंदला, वैभव बोनगीरवार, मनोज वनकर, व इतर कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे दि. ६ मे २०२४ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला काजल ठवरे, गंगाधर गजभिये, सत्यफुलाबाई चव्हाण, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून अभिवादन केले.



याप्रसंगी आशिक रामटेके व अशीत बांबोडे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सर्वांसाठी शिक्षण, स्त्रियांच्या हक्कांसाठी कायदे, जातीभेदावर प्रहार, दुष्काळ निवारण, पायाभूत सुविधा, आरोग्य व्यवस्था आणि शेती-उद्योग क्षेत्रात अनेक कल्याणकारी निर्णय घेतले.शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील मुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली.ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.अशा शब्दात मान्यवरांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं.

याप्रसंगी अशोक मेश्राम, सागर बोरकर, भावना बहादुरे,सरिता गजभिये व गावातील नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश मेश्राम यांनी केले व आभार प्रदीप मेश्राम यांनी मानले.

# तीन महिन्यापासून प्राथमिक शिक्षकांच्या वेतन विलंबास जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करा

**मूल । प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षकांचे वेतन महिन्याच्या १ तारखेला करण्यात यावे यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे त्यासाठी पी.एफ.एम.एस.,सी.एम.पी.,ई कुबेर प्रणाली सुरु करण्यात आली मात्र अजुनही वेतनाची ऑनलाइन प्रणाली यशस्वी झालेली नाही.

दोन तीन महिने सी.एम.पी.प्रणालीद्वारे प्राथमिक शिक्षकांचे वेतन महिन्याच्या एक तारखेला झाले. आणि डव्हान्स टेक्नॉलॉजी म्हणून ई कुबेर प्रणाली वेतनासाठी उपयोगात आणली पण पूर्णत: अपयशी ठरलेली आहे परिणामी गेल्या मार्च एप्रिल या दोन महिन्याचे वेतन अजुनही झालेले नाही त्यामूळे प्राथमिक शिक्षक आर्थिक विवंचनेत आहेत व आर्थिक घडी विस्कटली आहे. कर्जाच्या व्याजाचा बोजा वाढत आहे, कर्ज वसुलीसाठी बँकेकडून तगादा सुरू आहे. मार्च २०२४ ला काही मोजक्याच अर्थकारण केलेल्या शिक्षकांचे थकीत देयके शालार्थ वेतन प्रणाली चे कनिष्ठ सहायक यांनी मंजूर करून काढले. त्यांची खाते क्रमांक चुकीचे टाकले आणि घाईगडबडीत सर्व घोळ झाला. काही शिक्षक सेवानिवृत्त, काही मयत अशांचे थकीत देयके काढतांना खाते क्रमांक चुकीचे नोंदवून सारा गडबड घोटाळा करण्यात आला. त्याचा त्रास सर्व कार्यरत प्राथमिक शिक्षकाना भोगावे लागत आहे.

याला सर्वस्वी जबाबदार शालार्थ वेतन प्रणाली चे लिपिक जबाबदार आहेत. त्या २६ शिक्षकांचे ई कुबेर प्रणालीतील बिल क्लिअर होणार नाही तोपर्यंत नवीन मार्च एप्रिल चे बील ई कुबेर मध्ये नोंदविले जाणार नाहीं असे लेखा व वित्त विभागाचे म्हणणे आहे. असे चुकीचे धोरण अवलंबिनाऱ्या कर्मचाऱ्यावर सक्त कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने आज मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना निवेदनाद्वारे केलेली आहे. भेटीचे शिष्टमंडळात राज्यनेते विजय भोगेकर, जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार, जिल्हा सरचिटनिस सुरेश गीलोरकर, कोषाध्यक्ष सुनिल कोहपरे, दिवाकर वाघे, जीवन भोयर, लक्ष्मण खोब्रागडे, किशोर येनगंटीवार, विलास मोरे, रमेश कांबळे, यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# संगणक अर्हतेच्या सबबीखाली अति प्रदान वसुली करु नका

## महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत कार्यरत शिक्षकांच्या आदिवासी व एकस्तर वेतनश्रेणी वेतन निश्चितीची थकबाकी व १५ टक्के प्रोत्साहन भत्ता थकबाकी रक्कमेतून ज्या शिक्षकांनी संगणक अर्हता उत्तीर्ण केलेली नाही अशांच्या थकबाकीतून अति प्रदान वसुली करण्यात यावी असा चुकीचा आदेश मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर ने निर्गमित केलेला आहे.त्यामुळे ३१ मार्च २०२४ ला अर्थकारणाच्या माध्यमातून काही मोजक्या पंचायत समितीतील शिक्षकांचे प्रोत्साहन भत्ता थकबाकी व एकस्तर वेतनश्रेणी वेतन निश्चितीची थकबाकी काढण्यात आली,मात्र संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबबीखाली अति प्रदान वसुली करण्यात आली.अशी चुकीची कार्यवाही लेखा व वित्त विभागाकडून करण्यात आलेली आहे.

पंचायत समिती मूल चे शिक्षकांचे प्रोत्साहन भत्ता थकबाकी व एकस्तरवेतनश्रेणी वेतननिश्चिती ची थकबाकी बील तपासतांना मुद्दा क्र.६ मध्ये संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबब उल्लेखीत केलेली आहे व बील परत केले आहे. लेखा व वित्त विभागाचे लेखाधिकारी अपु-या ज्ञानाने चुकीचे निर्णय घेऊन शिक्षण विभागाला नाहक त्रास देण्याची कार्यवाही करीत असल्याचा महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचा आरोप आहे. या संबंधी संघटनेने माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत माहिती मागितली असता व अधिका-यांशी केलेल्या चर्चेनुसार लेखा व वित्त विभागाकडून संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबबीखाली अति प्रदान वसुली करण्यात यावी असे कोणतेही पत्र निर्गमीत केलेले नाही अशी कबुली दिलेली आहे पण सर्व पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी हेच संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबबीखाली अति प्रदान वसुली करीत आहेत असा जिल्हा परिषद लेखा व वित्त विभागाकडून सांगण्यात आले आहे व माहितीच्या अधिकारातून स्पष्ट झाले आहे. संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबबीखाली अति प्रदान वसुली न करता स्थगिती दिलेली असल्याचे अनेक शासन निर्णय निर्गमित झालेले आहे.सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.२७ नोव्हेंबर २०२० च्या नुसार संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबबीखाली अति प्रदान वसुली न करता स्थगिती दिली आहे. आजमितीस शिक्षकांनी संगणक अर्हता प्रमाण पत्र सादर करणे अनिवार्य आहे असे पत्र निर्गमीत केलेले नाही. परिणामी शिक्षकांनी संगणक अर्हता या बाबीकडे विशेष लक्ष घातलेले नाही. संगणक अर्हता प्रमाणपत्र ही बाब कार्यालयीन व प्रशासकीय मंत्रालयीन अधिकारी कर्मचारी यांचेशी निगडीत आहे. अध्यापनाचे काम करणारे शिक्षकांशी संगणक अर्हता अनिवार्य नसावी असा कयास शिक्षकांचा आहे अशी संघटनेची धारणा आहे. करिता यापुढे संगणक अर्हता उत्तीर्ण नसल्याचे सबबीखाली अति प्रदान वसुली करण्यात येवू नये व ज्या कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांची अति प्रदान वसुली केलेली आहे त्यांची रक्कम परत करण्यात यावी अशी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची मागणी आहे.

# पंचायत समितीत ५६ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे रक्तदान

## सामाजिक पाऊल : पं.स. तसेच ग्रामसेवक युनियनचे आयोजन







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आयएसओ मानांकित तथा पंचायत राज पुरस्कृत पंचायत समिती चंद्रपूर व बल्लारपूर तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन शाखा तर्फे पंचायत समिती चंद्रपूर येथील सभागृहात रक्तदान शिबीर नुकतेच पार पडले. रक्तदान शिबीराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी प्रशासक तथा गटविकास अधिकारी धनंजय साळवे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक गटविकास अधिकारी नितीन फुलझेले, गणेश चव्हाण, ग्रामसेवक युनियन शाखेचे किशोर धकाते, रविंद्र चावरे उपस्थित होते.

एप्रिल, मे महिन्यात आरोग्य विभागात रक्ताचा तुटवडा जाणवतो. अशावेळी आवश्यक गरजूंना रक्तांचा पुरवठा व्हावा या हेतूने गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांच्यासंकल्पनेतून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात एकुण ५६ पंचायत समितीचे कर्मचारी, ग्रामसेवक कर्मचारी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. शिबीराच्या यशस्वितेसाठी पंचायत समीती व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच ग्रामसेवक युनियनने परिश्रम घेतले.रक्तदान शिबीरात रक्तदान करणा-या कर्मचा-यांचा पंचायत समीतीतर्फे सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला. प्रयोगशील गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी सन्मानपत्रावर भारतीय संविधानाची उद्देशिका व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित राष्ट्रवंदना यास स्थान दिले. त्यामुळे हे सन्मानपत्र कर्मचारी व अधिका-यांना चांगलेच भावले. हे आदर्श सन्मानपत्र ठरले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक पाटील सह दोघे एसीबीच्या जाळ्यात

## बिअर शॉपीच्या लायसन्स करिता मागितली होती एक लाखाची लाच,

## अधीक्षक पाटील यांच्या संपूर्ण संपत्तीची व लायसन्स प्रकरणाची चौकशी करण्याची मनसेची मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बेकायदेशीरपणे सुरु असलेली दारू व परवाना धारक यांच्याकडून हप्तेखोरी यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक संजय पाटील हे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या रडारवर होतेच, मात्र अतिशय शातीरपणे हप्तेखोरीचा धंदा यांचा चालायचा, मात्र आता घुग्गुस येथील एका नवीन बिअर शॉपी लायसन्स देण्याच्या नावाखाली लाच मागितली असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे दिल्याने आज त्यांनी सापळा रचून अधिक्षक संजय जयसिंगराव पाटील, उपनिरीक्षक चेतन माधवराव खरोडे, कार्यालय अधिक्षक खटाल यांना रंगेहात पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले असल्याची माहिती समोर आल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक यांनी कोट्यावधी रुपयाची माया जमवली असल्याने त्यांच्या संपतीची चौकशी करून व यांच्या माध्यमातून आजपर्यंत दिलेले परवाने याची सखोल चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे यांनी केली आहे.

जिल्ह्यात दारूबंदी उठल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक संजय पाटील यांनी शेकडो बिअर बार, वाईन शॉपी, देशी दारू दुकान व ताडी दुकान संचालकाकडून कोट्यावधी रुपयाची माया लायसन्स रिन्युअल च्या नावाखाली कमावली सोबतच नवीन बिअर बार ,बिअर शॉपी व वाईन शॉपी ट्रान्सफर च्या नवीन लायसन्स च्या नावाखाली पुन्हा कोट्यावधी




रुपयाची माया जमवली होती. दरम्यान काही दारू दुकानें ही बेकायदेशीरपणे वाटण्यात आले होते. त्यामुळे कित्तेक तक्रारी जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यात आल्या होत्या मात्र संजय पाटील यांनी त्यात वेळ मारून नेऊन स्वतःला वाचविण्याचा प्रयत्न केला होता.मात्र आता त्यांचे बिंग फुटले असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक राहुल माकनीकर यांच्याकडे घुग्गुस येथील एका बिअर शॉपीच्या संचालकांनी तक्रार देऊन नवीन बिअर शॉपी करिता एक लाख रुपयाची लाच मागितली असल्याने एसीबी च्या अधिकारी यांनी राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयातील अधीक्षक संजय जयसिंगराव पाटील, उपनिरीक्षक चेतन माधवराव खरोडे, कार्यालय अधिक्षक खटाल यांना रंगेहात पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले असल्याची माहिती आहे. सदरची कार्यवाही ही राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपुर. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस उप अधीक्षक मंजुषा भोसले, ला.प्र. वि. चंद्रपूर, तसेच कार्यालयीन स्टॉफ पो. हवा. नरेशकुमार नन्नावरे, पो. हवा. हिवराज नेवारे, ना.पो.अं. संदेश वाघमारे, पो. अ. राकेश जांभुळकर, पो.अ. प्रदिप ताडाम, म.पो.अं. पुष्पा काचोळे व चापोकों सतिश सिडाम यांनी यशस्वी पार पाडली आहे.चंद्रपूर जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी ,कर्मचारी किवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतीरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# भारतीय जनता पार्टी मूल तालुका तर्फे विजय वडेट्टीवार यांचा जाहीर निषेध

**मूल । प्रतिनिधी**


२६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांना लागलेली गोळी कसाबच्या बंदुकीतून नव्हती तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी समर्पित पोलीस अधिकाऱ्याने झाडली होती हे सत्य ऍड.उज्वल निकम यांनी न्यायालयापासून लपवून ठेवले असा निखालस खोटा व गंभीर आरोप केल्याबद्दल विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा भारतीय जनता पार्टी मूल तालुक्याच्या वतीने दिनांक ०७ मे ला सायंकाळी ६ वाजता गांधी चौक मूल येथे त्यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. व त्यांच्याविरुद्ध नारे देण्यात आले. यावेळी उपस्थित भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वडेट्टीवार विरुद्ध रोष व्यक्त केला. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी भारतीय जनता पार्टीने मागणी केली.

वडेट्टीवार यांनी २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या हल्ल्या संदर्भात ऍड.उज्वल निकम यांच्या विरोधात खोटे व बदनामीकारक आरोप केले आहेत. त्या




हल्ल्यात दहशतवाद्यांविरोधात देशप्रेमी पोलीस अधिकारी व योध्यांनी आपल्या प्राणाची पर्वा न करता दहशतवादी कसाबला अटक केली. प्रसंगी पोलीस अधिकाऱ्यांनी देशासाठी आपले बलिदानही दिले. परंतु विजय वडेट्टीवार यांनी देशभक्त पोलीस अधिकारी यांच्या बलिदानाची क्रूर थट्टा केलेली आहे. वडेट्टीवार यांनी केलेल्या बिनबुडाच्या आरोपामुळे ऍड.उज्वल निकम यांची बदनामी झालेली आहे. देशभक्तांची बदनामी करणाऱ्या काँग्रेसच्या या जबाबदार नेत्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या व चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष संध्या गुरूनुले यांनी केली. यावेळी नगरपरिषद मूल च्या माजी अध्यक्ष प्रा.रत्नमाला भोयर, नगरपरिषद मूल चे माजी उपाध्यक्ष नंदकिशोर रणदिवे, भाजपा मूल शहर सरचिटणीस अजय गोगुलवार, चंद्रकांत आष्टणकर, माजी नगरसेवक महेंद्र करकाडे,अनिल साखरकर, मिलिंद खोब्रागडे, नगरपरिषद मूल चे माजी उपाध्यक्ष प्रवीण मोहुर्ले, भाजपा महिला आघाडी मूल शहराध्यक्ष प्रा.अर्चना चावरे, प्रा.डॉ.किरण कापगते, प्रशांत बोबाटे, सुखदेव चौथाले, संजय येनुरकर,बबन गुंडावार, दादाजी येरणे, युवराज चावरे, प्रमोद कोकुलवार, प्रशांत कोहळे, विवेक मांदाडे, सुरज मांदाडे, सचिन गुरनुले व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पशुपक्षी प्रेमासाठी राहुलचा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी



**मूल । प्रतिनिधी**

उन्हाची दाहकता दिवसेंदिवस वाढत आहे. मनुष्यासह मुक्या प्राण्यांच्या जिवाची लाहीलाही होत आहे.अशा तप्त उन्हात पशुपक्ष्यांना पाणी व अन्नावाचून धोका होऊ नये यासाठी मूल येथील पक्षीमित्र राहुल आगडे यांनी चिमण्या व इतर पक्ष्यांसाठी चक्क आपल्या घरी पक्षी घरकुलाची निर्मिती केली आहे. तेथे अन्न व पाण्याची सोयही केली आहे.त्याचबरोबरच उन्हाची तीव्रता कमी होण्यासाठी गच्चीवरच बाग फुलवली आहे. पशुपक्षी प्रेमासाठी राहुलचा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. चंद्रपूर जिल्ह्याचे तापमान देशात सर्वोच्च पातळीवर असते. तप्त उन्हाच्या झळामुळे बरेच पशुपक्षी तडफडत रस्त्यावर मरनासन्न अवस्थेत दिसून येतात. ही स्थिती बघून पक्षीमित्र राहुल आगडे यांनी घरी पक्षी घरकुल बांधले आहे. येथे येणाऱ्या पशुपक्ष्यांना तो दाणापाणी करत असतो. त्यांना थंडावा मिळावा म्हणून गच्चीवरच बाग फुलवली आहे. या बागेमुळे पक्ष्यांना थंडावा निर्माण करण्यात आला. याच ठिकाणी पक्ष्यांकरिता पाण्यासाठी जलपात्र बांधण्यात आले आहे. त्याच्या या घरकुलात अनेक पशुपक्षी येत असल्याचे दिसून येते.

**शालेय शिक्षण घेत असताना पक्ष्यांच्या संवर्धनासाठी काही तरी करण्याची धडपड सुरू होती. उन्हाळ्याच्या दिवसांत चिमण्या व इतर पक्ष्यांना पाणी व अन्नासाठी धडपड करावी लागते. त्यामुळेच आपल्या घरी ती सोय करावी असा विचार केला. तेव्हापासून हा उपक्रम सुरु केला. इतरांनी देखील असा उपक्रम केल्यास पशुपक्ष्यांचे जीवही वाचतील व आपणास आत्मिक समाधान मिळेल.**

**– राहुल आगडे,**
**पक्षीप्रेमी मूल**

# कलाविष्कारचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**पुलगाव । प्रतिनिधी**

कलाविष्कार मंडळ पुलगावच्या वतीने ४२ वा वर्धापन दिन गांधीनगर परिसरातील कलाविष्कारने उभारलेल्या सांस्कृतिक स्तंभ येथे दिनांक ५ मे रोजी साजरा करण्यात आला.

यानिमित्त जळगाव खान्देश येथील परिवर्तन नाट्य संस्थेच्या वतीने अरुण कोल्हटकर यांचे काव्यसंग्रहावर आधारित काव्यावर दीर्घांक नाटक भिजकी वही चे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला मंचावर प्रमुख पाहुणे विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था पुलगावचे उपाध्यक्ष बबन बरवड , सामाजिक कार्यकर्ते सुमंत मानकर,सराफा असोसिएशनचे अध्यक्ष सुधीर बांगरे, व मंडळाचे अध्यक्ष दिलीप घालणी व सचिव विठ्ठल वानखेडे होते . कार्यक्रमाची सुरुवातीस दीप प्रज्वलन व नटराज मूर्तीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीस मंडळातर्फे.नाट्य रसिकांचे स्वागत कु.रेवा पाठक व कु.ऋतूता देशमुख यांनी केले. तर प्रास्ताविक कलाविष्कार मंडळाचे अध्यक्ष दिलीप घालनी यांनी केले. त्यांनी मंडळांच्या ४२वर्षांचा इतिहास सांगून मंडळाने कशी प्रगती केली? हे सांगीतले. व मंडळचे माजी अध्यक्ष स्व.प्रमोद बोराटने.स्व.अविनाश श्रीराव स्वर्गीय सदस्य दीपक पसारकर. शरद रघाटाटे.अरविंद पोहरे, मानवेंद्र देशमुख, शरद अवथनकर यांचे स्मरण केले. चेतन साहू यांनी सुंदर कवितेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे संचालन मंडळाचे सचिव विठ्ठल वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन अविनाश शहागडकर यांनी केले या कार्यक्रमात महाराष्ट्र मोटार कामगार संघटनेचे पदाधिकारी प्रमोद बमनोटे.देवळे.बंशी यांनी सिने नाट्य कलावंत व दिग्दर्शक अरविंद बाभळे यांनी अमरावती येथे नाट्यक्षेत्रात उल्लेखनिय कार्याबद्दल जीवनगौरव पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदन देशमुख, विठ्ठल वानखेडे, दिलीप घालनी, संजय यावलकर, मनोज डोल्हारे, सुधीर खेडकर, रवि पाठक, संतोष बैतुले. शामसुंदर देशमुख, प्रमोद बमनोटे , गजुभाऊ देवळे. रायपूरे भरत ठाकूर, अरविंद बाभळे, दिलीप .देशमुख, प्रदीप देशमुख.किशोर कडू. अविनाश शहागडकर , बंडू बदर. संजय खेडकर यांनी केले व विनोद सावसाकडे यांनी वेळेवर विशेष सहकार्य केले. व संस्कार भारतीचे .सागर पेरके यांनी मंचासमोर आकर्षक अशी रांगोळी काढलीभीजकी वही चे दिग्दर्शक स्नभू पाटील व सर्व महीला कलावंत यांचे स्वागत मंडळांच्या महिला सदस्याच्या हस्ते करण्यात आले. . कार्यक्रमासाठी असंख्य महिला नाट्यरसिक व पुरुष नाट्य रसिक उपस्थित असून त्यांनी सदर कार्यक्रमास जबरस्त प्रतिसाद देउन पुलगावला खरे नाट्य रसिक असल्याचा दाखला दिला. मंडळातर्फे रसिकांचे आभार मानून अभिनंदन केले.

# वाढदिवसा निमित्य रूग्णांना फळवाटप

**मूल । प्रतिनिधी**

शहरातील कुमुदिनी भोयर प्रेस क्लबच्या सचिव, मुल तालुक्यातील प्रथम महिला पत्रकार, गायिका यांच्या वाढदिवसा निर्मित्य ६ मे ला शहरातील मिडीया पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व मित्र मंडळींनी मूल शहरातील उपजिल्हा रूग्णालयातील रूग्णांना फळ वाटप केले.

समाजात समाजसेवी महिला पत्रकार, गायिका,मनमिळावू व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेल्या कुमुदिनी यांचे शहर,ग्रामीण ,गोरगरीब जनतेच्या खाजगी,शासकीय कोणत्याही कामाकरिता सदैव धावून जाणारी म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना अनेकांनी भावी नगरसेविका असा उल्लेख करीत कुमुदिनीला शुभेच्छा दिल्या. कुमुदिनी भोयरला वाढदिवसा निमित्य शहरासह,तालुक्यातील परिसरातून शुभेच्छाचे




वर्षाव झाले. रूग्णालयात फळ वाटप करते वेळी उपजिल्हारूग्णालय अधीक्षक, तथा सामाजिक कार्यकर्ते, विजय सिद्धावार, विवेक मुत्यालवार,संदीप मोहब्बे, निलेश रायकंटीवार,बब्लू सय्यद,सतीश राजूरवार, राकेश मोहुर्ले,धर्मेन्द्र सूत्रपवार, प्रफुल येरचलवार, नयन कोलप्याकवार ,साहिल भोयर, नागरीक व बहूसंख्या युवक उपस्थित होते.

# अवैध धंदे व रेती तस्करी रोखण्यासाठी भाजयुमोचा एल्गार

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

मागील काही काळापासून शहरात व हिंगणघाट महसूल उपविभागात अवैध व्यवसायाने डोके वर काढले आहे. नियमबाह्य भुखंड विक्री सारखे व्यवसाय फोफावल्याचे दिसून येत असून यात राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या आशीर्वादाने व स्थानिक नेत्यांच्या सूचनेवरून कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अवैध व्यवसाय सुरू असल्याचा आरोप करीत भाजयुमो या विरोधी एल्गार पुकारला.

दि.६ रोजी युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी स्थानिक उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले तसेच परिविक्षाधीन आयपीएस पोलिस अधिकारी वृष्टी जैन यांना निवेदन देऊन कारवाईची मागणी केली आहे.या संबंधात तात्काळ कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारासुद्धा युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. अवैध भूखंड व्यवसायाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची माया जमविण्याच्या हेतूने सामान्य व कष्टकरी जनतेच्या विश्वासाला छेद देऊन एन.ए.टी.पी मंजूर नसलेल्या व ज्या भागात पूर परिस्थिती निर्माण होते अशा बारामती ले-आऊट, महाकाली नगरी व हिंगणघाट नदी लगतच्या परिसरातील अनेक लेआऊट मध्ये शहरात ३ वर्षापुर्वी निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. तत्कालीन निर्माणाधीन असलेल्या बारामती नगरीत मोठ्या प्रमाणात पुढील १ ते २ महिन्यापर्यंत पाणी साचले असल्याने तेथील प्लॉट धारकांच्या मनांत दहशतीचे वातावरण निर्माण झाले, त्यांनी लेआऊट मालकाकडे भुखंड परत घेण्याची विनंती केली असता त्या गरीब कष्टकरी जनतेला त्या बारामतीचा आशीर्वाद घेऊन आपली राजकीय पोळी शेकणाऱ्या नेत्याच्या कार्यकर्त्यांनी सदर प्लॉट धारकांना जीवे मारण्याची धमकी दिली तसेच जमा केलेली रक्कम परत पाहिजे असल्यास दिलेल्या रकमेतून ४०% पैसे कपात करु व उर्वरित ६०% रोख रक्कम परत मिळेल असे धमकावल्याने रोजमजुरी करून व राब-राब कष्ट करून उभ्या केलेल्या पैश्यावर पाणी फेरले या विवंचनेत त्यांनी आपले भुखंड तसेच ठेवले व भविष्यात निर्माण होणाऱ्या धोक्याबद्दल जीव मुठीत घेऊन गप्प राहिले.उपरोक्त भुखंडधारकांची फसवणूक होत असल्याचे



निदर्शनास आल्यानंतरही मुंबईतील नेत्यांच्या व बारामतीच्या नेत्याच्या आशीर्वादाने स्वतःला समाजसेवक म्हणवून घेणाऱ्या स्वयंघोषीत तथाकथित नेत्याने प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून व मुंबईतील नेत्यांचा धाक दाखवून रेड झोनमध्ये असलेल्या जमिनीवरती अवैधरित्या लेआऊट निर्माण करून भविष्यात सामान्य नागरिकांना त्रास देण्याच्या उद्देशाने खोटेनाटे आश्वासन देऊन व लेआऊट निर्मितीसाठी लागणाऱ्या नियमांची अंमलबजावणी न करता जमिनी विकण्याचा गोरखधंदा हिंगणघाट शहरात मोठ्या प्रमाणात सुरुच ठेवला आहे. याचं धर्तीवरती महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून शहरात तसेच ग्रामीण भागात अवैध रेती तस्करीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना हाताशी धरून वणा नदीच्या पात्रात असलेल्या समुद्रपूर तालुक्यातील व मांडगाव-हिंगणघाट तालुक्यातील दारोडा, शेकापूर, सावंगी, साती, कात्री घाटातून जेसीबी व पोकलेनच्या माध्यमातून वाळूचा अवैध उपसा करून टिप्पर व ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात राजरोसपणे वाहतूक करून विक्री केल्या जात असल्याचे सुद्धा निदर्शनास येत आहे, असे असूनसुद्धा मुंबईतील वरिष्ठ नेत्यांच्या दबावाने हिंगणघाट शहरातील महसूल प्रशासन काहीही कारवाई करीत नसल्याचे दिसून येत आहे. सदर अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कुठल्याही मुंबईतील तसेच राज्यातील वरिष्ठ राजकीय नेत्यांच्या दबावाला बळी न पडता येत्या ५ दिवसांच्या आत कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सोनू पांडे, शहर महामंत्री तुषार हवाइकर, महामंत्री तुषार येनोरकर, भुषण आष्टणकर, शहर उपाध्यक्ष मयूर येसनसुरे,स्वप्नील सुरकार, आशिष खिळेकर, ओम भोमले, सुरज काटकर, शंकर मोरे, रोहित हांडे, युवराज माउसकर, रितीक दांडेकर, बाबू रमिझ, नितीन नांद, सचिन मोरे, कुणाल रघाटाटे, योगेश जिकार,भूषण देहाडराय, सागर शेंडे, दिनेश खियानी, अमित कामडी, तेजस मुन, गणेश मस्के, हर्षद गिरडकर, सुजल नारनवरे, अनिकेत डबले, साहिल शेंडे इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .